**१.** वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) नियम १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम व यातील तरतुदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करुन आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

**२.** सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसूली दाखल्याची अमंलबजावणी करण्याकरिता असतील.

**३.** वसूली अधिकारी यांनी या कार्यालयाने दि. ३१/१०/२०१८ रोजी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानूसार दरमाह विहीत नमून्यात कर्ज वसूलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था धुळे यांना सादर करावी.

**४.** अधिकार प्रदान केलेल्या वसूली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्त झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यु झाल्यास अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

**५.** वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

**६.** शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४/ प्र. क्र. २३१/१५-स, दि. २३/११/२००६ अन्वये वसूली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

**७.** वसूली अधिकाऱ्यास त्यास त्याच्या नावापुढे कोठेही **"महाराष्ट्र शासन नियुक्त आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी वसूली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसूली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

**८.** वसूली अधिकाऱ्यास वसूलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर **"वसूली अधिकारी, दि शिरपूर पिपल्स को-ऑप बँक लि. शिरपूर जि. धुळे"** असा फलकलावता येईल.

**९.** वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/ जामीनदाराच्या पगार कपाती बाबात राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देवून परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/ जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापेवरील आहरण व संवितरण अधिकारी/ पगार करणार अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

**१०.** वसूली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसूली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ अन्वयेचे आदेश दिनांक ६/४/२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अमंलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणत्याही रक्कम वसूल करता येणार नाही.

**११.** या कार्यालयाचे दि. ३१/१०/२०१८ रोजीच्या परिपत्रकीय सुचनांचे वसूली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसूली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा पहरपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

**१२.** वसूली अधिकारी यांनी निर्गमीत करावयाच्या नोटीस/ आदेश/ घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या व आदेशाचा संदर्भ नमुद करावा.

दिनांक- १५/१०/२०२०.

**सुधीर तुंगार,**
अपर निबंधक (प्रशासन),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

५

**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांजकडून**

**अधिसुचना**

**क्र. वि-१/संस्था/नोंदणी/विर माहेश्वर/पत/२४९६.–** जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांचेकडून असे अधिसुचित करण्यात येते की, **विर माहेश्वर अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. लातूर ता. जि. लातूर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९ (१) अन्वये नोंदणी क्रमांक एलटीआर/साध/पतसंस्था/१५६१/२०२० ने नोंदविण्यात आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम क्रमांक १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण "**साधन संस्था**" संपत्ती असून उपवर्गीकरण "**कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था**" असे आहे.

लातूर, ७ डिसेंबर, २०२०.

**समृत जाधव,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

---

६

**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांजकडून**

**प्रसिध्दीकरण**

**क्र. वि-१/संस्था/नोंदणी/विर माहेश्वर/पत/२४९६.–** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था लातूर असे अधिसुचित करीत आहे की, **श्री. किर्तीकुमार जगदेव स्वामी देवणीकर मुख्यप्रवर्तक नियोजीत, विर माहेश्वर अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. लातूर ता. जि. लातूर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदणी करण्यात आली आहे.

सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १२ (१) च्या अनुषंगाणे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) मध्ये नमूद केल्या नुसार संस्थेचे वर्गीकरण साधन संस्था असून उपवर्गीकरण कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था असा आहे.

लातूर, ७ डिसेंबर, २०२०.

**समृत जाधव,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

---

७

**पोलीस आयुक्त यांजकडून**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये**

**आदेश**

**क्र. विशा-५/आदेश/औ.बाद/२०२०-५२९५:-** ज्या अर्थी माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, औरंगाबाद शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये विविध राजकीय पक्ष तसेच संघटना तर्फे त्यांच्या निरनिराळ्या मागण्यांच्या तसेच इतर विषया संदर्भात काही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दिनांक २०/१२/२०२० रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी आहे.

दिनांक २५/१२/२०२० रोजी ख्रिसमस नाताळ सण आहे.

दिनांक २९/१२/२०२० रोजी श्रीदत्त जयंती आहे.

माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर -२०२० मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर कार्यक्रमानुसार औरंगाबाद जिल्ह्यातील ६१८ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका होणार असून दि. ११/१२/२०२० पासून आचार संहिता लागू झाली असून ती निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

महानगरपालिकेच्या वतीने कर वसुली मोहीम राबविण्यात येण्याची शक्यता असुन सदर बाबत स्थानिक नागरीकांकडून व लोकप्रतिनीधी कडून विरोध होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

लॉकडाऊन काळातील विज बिल माफीसाठी राजकीय पक्ष/संघटना यांचेकडून आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

मराठा आरक्षण संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण व नोकर भरती बाबत स्थगिती दिल्याने मराठा समाजात असंतोष असून त्या अनुषंगाणे मराठा संघटनांकडून आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

मुस्लिम व धनगर समाजाच्या आरक्षण संदर्भात मुस्लिम व धनगर समाजाच्य वतीने तसेच विविध राज्यकिय पक्ष/संघटना यांचेकडून आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

संसदेत कृषी विषयक विधेयक मंजूर झाले असून सदर विधेयकास शेतकरी, विविध राजकीय पक्ष/संघटना यांना विरोध असून त्या अनुषंगाने त्यांचेकडून आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

औद्योगिक तसेच इतर संघटीत/असंघटीत कामगार संघटनांकडून त्यांच्या विविध मागण्यासंदर्भात आंदोला नात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

औरंगाबाद शहर हे संवेदनशिल असल्याने कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता अबाधीत राहावी आणि कोरोनाचा संसर्ग वाढू नये म्हणुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे जरुरीचे वाटते.

वरील कारणामुळे कोणताही अनुचित प्रकार घडु नये आणि सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन मी **डॉ. निखील गुप्ता, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर** असे आदेशीत करीत आहे की, औरंगाबाद पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ति व्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी अथवा त्याचे जवळपास कोणत्याही व्यक्तीस –

(अ) शस्त्रे, सोटा, तलवार, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया, किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तु जवळ बाळगणार नाही.

(ब) ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२० प्रक्रियेदरम्यान सार्वजनिक शांतता भंग होऊनये यासाठी कोणत्याही व्यक्तीस, अधिकृत अग्निशस्त्र परवाना धारक यांना त्यांच्या जवळील अग्निशस्त्र निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्रचार सभा, प्रचारादरम्यान, मतदान प्रक्रिया तसेच मतमोजणी प्रक्रियेवर पभाव पडेल अशा रितीने सार्वजनिक ठिकाणी जवळ बाळगणे, प्रदर्शन करणे, दाखविणे इत्यादी बाबी करण्यास प्रतिबंध आहे.

(क) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ सोबत बाळगणार नाही.

(ड) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची साधने बाळगु नये, जमा करु नये किंवा तयार करणार नाही.

(इ) कोणत्याही व्यक्तिची प्रतिमा अथवा प्रेते किंवा आकृत्या यांचे प्रदर्शन करणार नाही.

(फ) जाहीरपणे घोषणा करु नये, गाणे किंवा त्यांचे ध्वनिमुळे सार्वजनिक शांतता भंग होणार नाही असे ध्वनिक्षेपण करु नये.

(ग) अशा प्राधिकाऱ्यांच्या मते ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धक्का पोहचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे करु नये, सोंग अगर हावभाव करु नये आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करु नये, त्याचे प्रदर्शन करु नये किंवा त्यांचा जनतेस प्रसार करु नये.

तसेच आणखी असे ही आदेशीत करीत आहे की, संपूर्ण औरंगाबाद पोलीस आयुक्तालय हद्दीत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तिंना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्यास, निदर्शने, धरणे, मोर्चा, मिरवणुक काढण्यास मनाई करण्याचा आदेश देत आहे. हा आदेश अंत्यविधी, विवाह समारंभ आणि कर्तव्यावरील कोणतेही पोलीस आधिकारी, कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी तसेच पोलीस उपआयुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, आणि पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी दिलेल्या परवानगी नुसार घेतलेल्या कार्यक्रमांना हा आदेश लागु होणार नाही.

**सदरचा आदेश औरंगाबाद पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक १५/१२/२०२० चे ००.०१ वाजे पासून ते दि. २९/१२/२०२० चे २४.०० वाजेपावेतो लागु राहील.**

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास उल्लंघन करणारी व्यक्ति ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये कारवाईस पात्र राहील.

मी पुढे असेही नमुद करतो की, सदरच्या आदेशाची नोंद ही कार्यालयीन राजपत्रात समविष्ट करण्यात येईल किंवा औरंगाबाद पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील दर्शनीय ठिकाणी चिटकावून ध्वनिक्षेपकाद्वारे जाहीर करण्यात येईल.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक १४/१२/२०२० रोजी काढण्यात आला आहे.

औरंगाबाद, १४ डिसेंबर, २०२०.

**डॉ. निखील गुप्ता,**
पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.

---

८

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

पहाः- श्रीमती एम.एस. कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांचा दिनांक ८/०१/२०२० ते १०/०१/२०२० या (०३) दिवसांची अर्जीत रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/२४८/२०२०.–** जिल्हा न्यायाधीश-१,जालना हे श्रीमती एम.एस. कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांची दिनांक ०८/०१/२०२० ते दिनांक १०/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, रजेनंतर दिनांक ११/०१/२०२० व १२/०१/२०२० रोजीच्या शासकीय सुट्टीचा फायदा दिनांक ७/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक १३/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्रीमती एम.एस. कुलकर्णी, ह्या सदरील अर्जित रजेवर गेल्या नसत्या तर त्या स्थानापन्न, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्रीमती एम.एस. कुलकर्णी, ह्या दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीतील दि. ८/१/२०२० ते १०/१/२०२० पर्यंतचे तातडीचे कामकाज श्रीमती एच. ए. अन्सारी, सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, जालना आणि दिनांक ११/०१/२०२० व १२/०१/२०२० रोजीचे तातडीचे श्रीमती के.एस. झंवर, २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर जालना यांनी स्वतःच्या कामासह सांभाळावे.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत आली आहे.

जालना, ७ जानेवारी, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**
जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश जालना.

---

९

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

पहाः- श्रीमती बी.के. पाटिल, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बदनापूर यांचा दिनांक १३/०१/२०२० ते १५/०१/२०२० या (०३) दिवसांची अर्जीत रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/२८३/२०२०.—** जिल्हा न्यायाधीश-१,जालना हे श्रीमती बी.के. पाटिल, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बदनापूर यांची दिनांक १३/०१/२०२० ते १५/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, तसेच रजेपुर्वी दिनांक ११/०१/२०२० व १२/०१/२०२० रोजीचा शासकीय सुट्टीचा फायदा, मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्रीमती बी.के. पाटिल, हया सदरील अर्जित रजेवर गेल्या नसत्या तर त्या स्थानापन्न, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बदनापूर म्हणुन काम करीत राहिल्या असत्या.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्रीमती बी.के. पाटिल, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बदनापूर म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीत श्रीमती बी. एस. गायकवाड, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बदनापूर यांनी स्वतःचे काम सांभाळुन अर्जदाराच्या न्यायालयाच्या कार्यभार सांभाळावा.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, ८ जानेवारी, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**
जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश जालना.

---

१०

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्रीमती पुजा एन. कोकाटे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, परतूर यांचा दिनांक ७/०१/२०२० ते ०९/०१/२०२० या (०३) दिवसांची अर्जीत रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/२४७/२०२०.–** जिल्हा न्यायाधीश-१, जालना हे श्रीमती पुजा एन. कोकाटे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, परतूर यांची दिनांक ०७/०१/२०२० ते दिनांक ०९/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, दिनांक ०६/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक १०/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्रीमती पुजा एन. कोकाटे, हया सदरील अर्जित रजेवर गेल्या नसत्या तर त्या स्थानापन्न, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, परतूर म्हणुन काम करीत राहिल्या असत्या.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्रीमती पुजा एन. कोकाटे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, परतूर म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीत श्री एम.एस. भरड, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, परतूर यांनी स्वतःचे काम सांभाळून अर्जदाराच्या न्यायालयाच्या कार्यभार सांभाळावा.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत आली आहे.

जालना, ०६ जानेवारी, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**
जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश जालना.

---

११

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्रीमती एम. वाय. डोईफोडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांचा दिनांक ०२/०१/२०२० ते ०४/०१/२०२० पर्यंतची एकून (०३) दिवसांची परिवर्तीत रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/९०/२०२०.–** जिल्हा न्यायाधीश-१, जालना हे श्रीमती एम. वाय. डोईफोडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांना दिनांक ०२/०१/२०२० ते ०४/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची परिवर्तीत रजा, रजेनंतर दिनांक ५/०१/२०२० रोजीच्या शासकीय सुट्टीच्या फायद्यासह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्रीमती एम. वाय. डोईफोडे, हया सदरील परावर्तीत रजेवर गेल्या नसत्या तर त्या स्थानापन्न, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणुन काम करीत राहिल्या असत्या.

उपरोक्त परिवर्तीत रजेवरुन परत आल्यानंतर श्रीमती एम. वाय. डोईफोडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त परिवर्तीत रजेच्या कालावधीत अर्जदाराचे तसेच त्यांचेकडे ठेवण्यात आलेले श्रीमती के. एस. झंवर, २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, जालना यांचे न्यायालयाचे तातडीचे कामकाज श्री. एस.टी. चिकणे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, जालना यांनी सांभाळावे.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, ०२ जानेवारी, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**
जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश जालना.

---

१२

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्रीमती के.एस. झंवर, २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांचा दिनांक ०२/०१/२०२० ते ०४/०१/२०२० पर्यंतची एकून (०३) दिवसांची अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/३०/२०२०.–** जिल्हा न्यायाधीश-१, जालना हे श्रीमती के.एस. झंवर, २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांना दिनांक ०२/०१/२०२० ते ०४/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा, रजेनंतर दिनांक ५/०१/२०२० रोजीचा शासकीय सुट्टीचा फायदा, दिनांक १/१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ६/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्रीमती के.एस. झंवर, हया सदरील अर्जित रजेवर गेल्या नसत्या तर त्या स्थानापन्न, २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणुन काम करीत राहिल्या असत्या.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्रीमती के.एस. झंवर, २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीत श्रीमती एम.वाय. डोईफोडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, जालना यांनी स्वतःचे कामकाज सांभाळून अर्जदाराच्या न्यायालयाचे कामकाज सांभाळावे.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, १ जानेवारी, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**

जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश जालना.

---

१३

**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्री ए.एल. टिकले, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना यांचा दिनांक २/१/२०२० ते ४/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/२९/२०२०.-** प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना हे श्री ए.एल. टिकले, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना यांना दिनांक ०२/०१/२०२० ते ०४/०१/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसाची अर्जित रजा, रजेनंतर दिनांक ५/०१/२०२० रोजीचा शासकीय सुट्टीचा फायदा, दिनांक १/१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ६/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्री ए.एल. टिकले, हे सदरील अर्जित रजेवर गेले नसते तर ते स्थानापन्न, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना म्हणुन काम करीत राहिले असते.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्री ए.एल. टिकले, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना म्हणुन जिल्हा न्यायालयात काम करतील.

अर्जदाराच्या उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीतील त्यांचे न्यायालयाचे तातडीचे कामकाज श्री. आर. एन. प्रधान, जिल्हा न्यायाधीश-३ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश जालना यांनी सांभाळावे.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, १ जानेवारी, २०२०.

**श्रीमती एस.के. केवले,**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना.

---

१४

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्री एच. बी. परदेशी, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांचा दिनांक २/१/२०२० ते ४/०१/२०२० पर्यंतची एकुण (०३) दिवसांची अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/३१/२०२०.-** जिल्हा न्यायाधीश-१, जालना हे श्री एच. बी. परदेशी, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांना दिनांक ०२/०१/२०२० ते ०४/०१/२०२० पर्यंतची एकुण (०३) दिवसाची अर्जित रजा तसेच रजेनंतर दिनांक ५/०१/२०२० रोजीचा शासकीय सुट्टीचा फायदा, दिनांक १/१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ६/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्री एच. बी. परदेशी, हे सदरील अर्जित रजेवर गेले नसते तर ते स्थानापन्न, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी म्हणुन काम करीत राहिले असते.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्री एच. बी. परदेशी, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीत श्री आर. व्ही. निकम, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांनी स्वतःचे कामकाज सांभाळून अर्जदाराच्या न्यायालयाचा कार्यभार सांभाळावा.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, १ जानेवारी, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**

जिल्हा न्यायाधीश अपर सत्र न्यायाधीश, जालना.

---

१५

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्री बी,एस.जगदाळे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन यांचा दिनांक १२/१०/२०२० ते १४/१०/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसांची अर्जित रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/३९०५/२०२०.-** जिल्हा न्यायाधीश-१, जालना हे श्री बी,एस.जगदाळे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन यांना दिनांक १२/१०/२०२० ते १४/१०/२०२० पर्यंतची एकूण (०३) दिवसाची अर्जित रजा दि. १२/१०/२०२० रोजी पासून ते दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्री बी,एस.जगदाळे, हे सदरील अर्जित रजेवर गेले नसते तर ते स्थानापन्न सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन म्हणुन काम करीत राहिले असते.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्री बी.एस.जगदाळे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीत श्रीमती एस.एस. बजाज, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन यांनी स्वतःचे कामकाज सांभाळून अर्जदाराच्या न्यायालयाचा कार्यभार सांभाळावा.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबंधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, १२ ऑक्टोंबर, २०२०

**एस. जी. वेदपाठक,**
जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश, जालना.

---

१६

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून**

वाचा :- श्रीमती एम. वाय. डोईफोडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांचा दिनांक १९/१०/२०२० ते २३/१०/२०२० या (०५) दिवसांची अर्जीत रजा मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील आदेश.

**कार्यालयीन आदेश**

**क्र./(प्रशा)/३९४६/२०२०.**– जिल्हा न्यायाधीश-१, जालना हे श्रीमती एम. वाय. डोईफोडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांना दिनांक १९/१०/२०२० ते २३/१०/२०२० पर्यंतची एकूण (०५) दिवसांची अर्जित रजा, रजेपूर्वी दिनांक १८/१०/२०२० आणि रजेनंतर दि.२४/१०/२०२० व २५/१०/२०२० रोजीचा शासकीय सुट्टीचा फायदा, दिनांक १७/१०/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दि. २६/१०/२०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करीत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३९ (२) अन्वये असे प्रमाणित करण्यांत येते की, श्रीमती एम. वाय. डोईफोडे, हया सदरील अर्जित रजेवर गेल्या नसत्या तर त्या स्थानापन्न, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणुन काम करीत राहिल्या असत्या.

उपरोक्त अर्जित रजेवरुन परत आल्यानंतर श्रीमती एम. वाय. डोईफोडे, ह्या ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना म्हणुन दिवाणी न्यायालयात काम करतील.

उपरोक्त अर्जित रजेच्या कालावधीत दिनांक १९/१०/२०२० ते २३/१०/२०२० पर्यंत श्रीमती के.एस. झंवर, २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, जालना आणि दिनांक १८/१०/२०२०, २४/१०/२०२० व २५/१०/२०२० रोजी श्रीमती एच.ए. अन्सारी, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जालना यांनी स्वतःचे कामकाज सांभाळून अर्जदाराच्या न्यायालयाचे कामकाज सांभाळवे.

सदरील अर्जीत रजेची नोंद संबधीताच्या सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

जालना, १५ ऑक्टोंबर, २०२०.

**एस. जी. वेदपाठक,**
जिल्हा न्यायाधीश-१, व अपर सत्र न्यायाधीश जालना.

---

१७

**जिल्हाधिकारी यांजकडून**

**अधिसुचना**

**(भुसंपादन अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम १९ अन्वये)**

**क्र. २०२०/भुसं/समन्वये/सिआर-०५.**– ज्याअर्थी, उप विभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी निलंगा यांनी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, **अधिसुचना, क्रमांक-२०२०/भुसं/सिआर-०५ दिनांक २८/०४/२०२० व महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार ते बुधवार जानेवारी ९-१५,२०२० पान क्र. ६१** अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये आधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा तीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी निलंगा यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, लातूर यांची खात्री पटली आहे. आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदी अन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी निलंगा** यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची -एक**

**संपादित करावयाच्या जमीनीचे वर्णन**

**गावाचे नाव - बोरसुरी व टाकळी, तालुका - निलंगा, जि. लातूर**

| अनु. क्र. | भुमापन किंवा गट नंबर | फेर चौकशी नुसार क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | **मौ. बोरसुरी ता. निलंगा** | |
| १ | २ | ३ |
| १ | १३३ | ०.१५ |
| २ | १३६ | ०.२५ |
| ३ | १३६ | ०.५५ |
| ४ | १३७ | २.१७ |
| | **एकुण - अ** | **३.१२** |
| | **मौ. टाकळी ता. निलंगा** | |
| ६ | ७० | ०.५३ |
| ७ | ७२ | ०.०१ |
| ८ | ७४ | २.९८ |
| | **एकुण - ब** | **३.५२** |
| | **एकुण - अ + ब =** | **६.६४ हे आर** |

**अनुसूची दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांवः-** मौ. बोरसुरी साठवण तलाव ता. निलंगा

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः-** साठवण तलाव (धरणपीठ, सांडवा, पुच्छ, कालवा, खदाण) यासाठी

**समाजाला होणारे लाभः-** मौ. बोरसुरी , टाकळी , चिलवंतवाडी व परिसरातील गावाला कायमस्वरुपी पाणी पुरवठा व सिचंनाची सोय होणार आहे.

**अनुसूची तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.**

सदरील भुसंपादन प्रक्रियेमुळे कोणतीही व्यक्ती / कुटुंब सद्दस्थीतीमध्ये विस्थापीत होण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

**अनुसूची चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.**

दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रामध्ये प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्र. संकिर्ण ०१/२०१५ प्र. क्र. -३/अ-२ नुसार उक्त अधिनियमाचे कलम १० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्र. ५७ दिनांक २६ एप्रिल, २०१८ नुसार (SIA)गरज नाही.

**टिप :- उक्त जमीनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी निलंगा यांचे कार्यालयात निरिक्षण करता येऊ शकेल.**

**ठिकाण :- लातूर**

**दि.२७/११/२०२०.**

**जी. श्रीकांत,**
**जिल्हाधिकारी, लातूर.**

१८

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांजकडून**

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ११ (१) खाली**

**अधिसूचना**

**(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

**किल्लारी कवठा बॅरेज बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन ता. औसा जि. लातूर**

**संपादन :- मौ. कवठा ता. उमरगा, जि. उस्मानाबाद**

**क्र. २०२०/भूसं/सिआर/०१.–** ज्या अर्थी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या खंड कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतूका-द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२ दि. १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे ) या द्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, उस्मानाबाद जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमिन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (या पुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (०१) च्या तरतूदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (सदर प्रकल्पात कोणत्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही.)

आणि ज्याअर्थी, समाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोउलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (०१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासनाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (सदर प्रकल्पात पुनर्वसन व पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही.)

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जिमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट कलम (०५) नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (०३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भुमी अभिलेखाच्या अद्यवतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (ग) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा जिल्हा उस्मानाबाद यांस पदनिर्देशित केले आहे.

**(वि.रो. उदमले)**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी उमरगा ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

**अनुसूची एक**

**मौ. कवठा ता. उमरगा जि. उस्मानाबाद**

**किल्लारी कवठा बॅरेज बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन**

| अ.क्र. | भूमापन किंवा स.नं./गट क्रमांक | फेर संयुक्त मोजणी प्रमाणे संपादीत क्षेत्र हे.आर मध्ये |
|---|---|---|
| १ | २/२ | ० हे ०७ |
| २ | २/१ | ० हे ३१ |
| ३ | ४/२ | ० हे १२ |
| ४ | ४/१ | ० हे ३४ |
| ५ | ५ | १ हे ३५ |
| ६ | ६ | १ हे १७ |
| ७ | ७ | ० हे ४१ |
| ८ | १९ | ० हे १६ |
| ९ | १९/१/१ | ० हे ०६ |
| १० | १५५ | ० हे ५७ |
| ११ | १५५ | ० हे ३४ |
| १२ | १५५ | ० हे ५७ |
| १३ | १९/६/१ | ० हे २६ |
| | **एकूण क्षेत्र** | **५ हे. ७३ आर.** |

**स्वाक्षरीत**

**(वि.रो. उदमले)**

उपविभागीय अधिकारी तथा

भूसंपादन अधिकारी उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

### अनुसूची दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- किल्लारी कवठा बॅरेज बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन ता. औसा जि. लातूर

संपादन - मौ. कवठा, तालूका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**प्रकल्पाचे वर्णन** :- किल्लारी कवठा बॅरेज बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन ता. औसा जि. लातूर

संपादन - मौ. कवठा, तालूका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**समाजाला मिळणारे लाभ** :- प्रकल्पामूळे मौ. कवठा ता. उमरगा जिल्हा उस्मानाबाद या गावास अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होणार आहे.

### अनुसूची तीन

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** किल्लारी कवठा बॅरेज योजनेच्या बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन जिल्हा-उस्मानाबाद या कामामूळे कुठल्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही. सबब माहिती निरंक.

### अनुसूची चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

कार्यकारी अभियंता निम्न तेरणा कालवा विभाग क्र. २ लातूर यांनी सामाजिक परिणाम निर्धारण करण्याची आवश्यकता नाही. असे प्रमाणीत केले आहे.

### अनुसूची पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

**अ** - प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

**ब** - प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता लागू नाही.
:- निरंक

**क** - ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील :- निरंक

**टिप :** १) सदर प्रकल्पासाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे कुठल्याही व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही, त्यामूळे अधिनियम ४३ अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली नाही.

२) उक्त जमिनीच्या आराखडयाचे कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र. २ लातूर या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल. सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे उप कलम (०१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभीक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दि. २७.११.२०२०
ठिकाण :- उमरगा जिल्हा उस्मानाबाद.

**(वि.रो. उदमले)**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी उमरगा ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

१९

**BY COMMISSIONER OF TEXTILES & ADDITIONAL REGISTRAR, COOPERATIVE SOCEITIES, STATE OF MAHARASHTRA, NAGPUR**

**NOTIFICATION**

**No. SPM/D-6/Regn/4471/2020.--** Commissioner of Textile and Additional Registrar, Cooperative Societies, State of Maharashtra, Nagpur, hereby certify that **National Sahakari Sootgirni Ltd. Sillod, Taluka Sillod, District Aurangabad** has been registered under section 9(1) of the Mahaharashtra Cooperative Societies Act, 1960, (Maharashtra Act. No. XXIV of 1961). The Registration number of the society is No. AGD/PRG/(A)/DT-09 Dated 07 December 2020, and the same has been classified as "Processing Society" Sub Class "Agricultural Processing Society" under section 12 (1) of the said Act Act read with Rule 10(1) the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961.

**Dr. Madhavi Khode Chaware,**
Commissioner to Textiles &
Additional Registrar, Cooperative Soceities, State
of Maharashtra, Nagpur.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.